RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 November, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 November, 2017

अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : पंधरा | अंक : पाचवा | नोव्हेंबर २०१७



सन्तां दा कर लै संग मना (भजन) 4

मर्यादा (सत्संग) 5

आज्ञेचे पालन (अविस्मरणिय घटना) 27

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

सन्तां दा कर लै संग मना

परमसंत अजायब सिंहजी महाराजांनी रचलेले भक्तीभावात्मक भजन

सन्तां दा कर लै संग मना, चढ़ जाऐ नाम दा रंग मना
होमैं नूं अंदरों, होमैं नू अंदरों कढणा ऐं
आदत भैड़ी नूं छडणा ऐं,
सतगुरू दी शरणी, सतगुरू दी शरणी पैणा ऐं,
नाम जप के लाहा लैणा ऐं,

१. तैनूं मिलया मानस जामा ओऐ, तूं सांभ लवीं इंसाना ओऐ, (२)
लाहा लैण प्राणी, (२) आया ऐ, माया ने जाल पसाया ऐ,
सतगुरू दी शरणी...

२. कर बंदगी सोहणा बंदा ऐ, बंदगी दे बाजों गंदा ऐ, (२)
खाली ना जाऐ, (२) दम अड़या, ऐहे चम्म किसे नहीं कम अड़या,
सतगुरू दी शरणी...

३. सानूं नूरी दर्श दिखा दाता, साडी अक्ख दा पड़दा लाह दाता,(२)
बुरे सहण जुदाईयां, (२) दु:ख अड़या, सानूं तरे दर्श दी भुख अड़या
सतगुरू दी शरणी...

४. असीं जन्म–जन्म दे मैल भरे, उजले सतगुरू कृपाल करे, (२)
ओह तारण आया, (२) तारेगा 'अजायब' दे काज सवारेगा
सतगुरू दी शरणी...

मर्यादा

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, पल्टू साहेबांची वाणी
संतबानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान – २४ ऑगस्ट, १९९४

सकल विश्वाचे मालक, परमात्मा सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार असो ज्यांनी आपल्या आत्म्यांवर अनंत कृपा करीत आपल्या स्वगृही जाण्याचा मार्ग दर्शविला. संत–महात्मे, परमात्म्याचे प्रियजन, या जगात स्वत:चे असे कोणतेही मिशन चालविण्यासाठी येत नाहीत, तसेच या जगामध्ये अस्तित्वात असलेले कोणतेही समाज नष्ट करीत नाहीत. प्रत्येक युगामध्ये संत–महात्मे या जगात येतात, येथे जन्म–मृत्युच्या चक्रनेमीक्रमात भरकटत असलेल्या आत्म्यांपैकी ज्या आत्म्यांना शब्द–नामाशी जोडण्याचा आदेश त्यांना परमात्म्यांकडून मिळालेला असतो, त्या आत्म्यांना ते शब्द–नामाशी जोडतात आणि त्यांना त्यांच्या स्वगृही पोहोचवितात. तुमच्या समोर पल्टू साहेबांची लहानशी वाणी सादर केली जात आहे, ती तुम्ही लक्षपूर्वक ऐकावी.

पल्टू साहेबांचा जन्म अयोध्या नगरीत झाला होता. अयोध्या नगरी श्री रामचंद्रजींची नगरी आहे अशी जनमानसामध्ये मान्यता आहे. ज्याठिकाणी परमात्म्याचे प्रिय संत–महात्मे काही काळ सत्संग करतात, लोकांना शब्द–नाम देतात, त्या ठिकाणी, तेथील पंडित, पुरोहित, मौलवी लोकं त्या संत–महात्म्यांचा विरोध करतात. परंतु संत तेथून निघून गेल्यानंतर, तेच लोक, संतांच्या शिकवणीला कर्मकांडांचे स्वरूप देतात. बाह्यजगाकडे कल असलेला आत्मा संतांच्या शिकवणीमुळे जर जागृत होऊन, शब्द–नामाशी एकरूप होऊन अंतर्यात गेल्यास, त्या पाखंडी लोकांच्या पोटपुजेची मिळकत बंद होईल, या भीतीनेच ते संतांचा विरोध करतात.

आपण जाणतो की दोन समाजांचे एकमेकांशी पटत नाही. परंतु संतांची निंदा करण्यासाठी वा त्यांना त्रास देण्यासाठी मात्र ते एकत्रित होतात. त्यांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी तसे करावे लागते. स्वामीजी महाराज सांगतात:

पंडित भेख पेट के मारे वे सन्तन पर करते तान।
हितकर सन्त उन्हें समझाते वे मानी नहीं माने आन।
उनके चाह मान और धन की परमार्थ से खाली जान।।

कुणा एखाद्या संतांनी इतरांना त्रास वा शाप दिल्याचा उल्लेख इतिहासामध्ये कुठेही आढळत नाही. गुरू नानकदेवजी, कबीर साहेब, सुकरात, हजरत ईसा, मोहम्मद साहेब असे अनेक महात्मे या जगात आले. त्या-त्या वेळी दिशाभूल झालेल्या जनतेने त्यांना खूप त्रास दिला. परंतु त्या लोकांना महात्म्यांनी शाप दिल्याचा उल्लेख इतिहासात कुठेच आढळत नाही. किंबहूना त्या दिशाभूल झालेल्या लोकांसाठी महात्म्यांनी परमात्म्यासमोर प्रार्थना केली की,''हे परमात्मा! तू या लोकांना माफ कर. कारण यांना कल्पना नाही की ते करीत असलेले कृत्य योग्य आहे की चुकीचे आहे.''

संत जगाचे अनमोल शिरोभूषण असतात. ते लोकांची नि:स्वार्थ सेवा करतात. परंतु आपण त्यांच्याशी कशी वर्तणूक करतो? पल्टू साहेब अयोध्येत राहत होते. प्रभु रामचंद्रांनी हे जग त्यागल्यानंतर तेथे कर्मकांडांचा प्रसार झाला. जेथे अहोरात्र कर्मकांड होत असतील, तेथे संतमताचा प्रचार करणे संतांसाठी किती अवघड असेल? परमात्म्याने पल्टू साहेबांना जी जबाबदारी सोपविलेली होती त्याची पूर्तता त्यांनी अतिशय आत्मविश्वासाने आणि अंत:करणापासून केली. ज्या हिंदू-मुस्लिम लोकांवर परमात्म्याची कृपा होती, ते सर्वजण पल्टू साहेबांकडे जात असत. ज्या स्त्रिया पडद्याआड वावरत, त्यादेखील शब्द-ध्वनीचा आवाज ऐकल्यानंतर रूदन करीत बाहेर पडत असत की, आतापर्यंत आपण का बरे भरकटत होतो? त्यामुळे पंडित, मुल्ला, पुरोहित वगैरे सर्वजण पल्टू साहेबांचे शत्रू बनले. ते शत्रुत्व या थराला पोहचले की पल्टू साहेब राहत असलेली झोपडी त्या लोकांनी पेटवून दिली, ज्या अग्नीमध्ये पल्टूसाहेबांचा अंत झाला.

तुम्हीच विचार करा! महात्मा आपल्यावर उपकार करण्यासाठी येतात, परंतु आपण त्यांच्याशी कशी वर्तुणूक करतो? तरीही ते आपणांस शाप देत नाहीत. ते म्हणतात की, परमात्मा! यांना माफ कर.

गुरू गोविंद सिंहजींच्या पाच प्रिय शिष्यांपैकी भाई दया सिंह हे एक शिष्य होते. गुरू गोविंद सिंहजींच्या इतिहासात नोंद आहे की चंदू सवाईने गुरू अर्जुनदेवजींना तप्त तव्यावर बसविले. गुरू हरगोविंदजींनाही त्याने ग्वालेरच्या किल्ल्यात कैद करून ठेवले. एवढे करूनही त्याचे समाधान झाले नाही. त्यांना आणखीन त्रास कसा देता येईल, याबद्दल तो सतत विचार करीत राही. एके दिवशी भाई दया सिंहने गुरू गोविंद सिंहजींना विचारले,''चंदू सवाई तर आता नरकात जाऊन त्याने केलेल्या कर्मांची शिक्षा भोगत असेल ना?'' गुरू गोविंद सिंहजींनी हसून उत्तर दिले,''भाई दया सिंह! त्याच्या मृत्यूसमयीच गुरू नानकदेवजींनी त्याचा सांभाळ केला होता, कारण त्यास तीन गुरूंच्या दर्शनाचा लाभ झाला होता. तो त्यांना ना दिवसा ना रात्री विसरत होता. त्यामुळे त्याचे लक्ष केंद्रित झाले होते.'' कबीर साहेब सांगतात:

साधू स्यों झगड़ा भला, साकत स्यों नहीं मेल।

कमीत कमी त्यांचे स्वरूप तरी आपल्या नेत्रांसमोर असेल. संतांचे लक्ष यावर नसते की कोणाचे आपल्याशी वैर आहे? ते त्यांचे कार्य करीत असतात.

महाराज सावन सिंहजी उदाहरण देत असत की एकदा एक विंचू पाण्याच्या प्रवाहात वाहत चालला होता. ते पाहून एका महात्म्यांनी विचार केला की हा देखील एक आत्मा आहे, त्यात देखील जीव आहे. त्या विंचवास महात्मा पाण्याबाहेर काढत असताना विंचवाने महात्म्यांच्या हातास दंश केला. दंशाच्या वेदनेने महात्म्यांनी हात झटकला व तो विंचू पुन्हा पाण्यात पडला. अशाप्रकारे महात्म्यांनी विंचवाचे प्राण वाचविण्याचा अनेकदा प्रयत्न केला, पण प्रत्येक वेळी त्यांस विंचवाने दंशच केला. हा प्रकार तेथे उभा असलेला एक मनुष्य पाहत होता. तो महात्म्यांस म्हणाला,''महात्माजी, हा प्राणी जर दंश करण्याची सवय सोडत नसेल, तर तुम्ही त्यास पाण्यात वाहून जाऊ द्या.'' महात्म्यांनी उत्तर दिले,''प्रिय मित्रा! प्रत्येकाची आप-आपली सवय आहे. तो जर त्याची दंश करण्याची सवय सोडत नसेल, तर मी इतरांवर उपकार करण्याची माझी सवय का सोडू?''

जेव्हा माझे गुरूदेव परमात्मा कृपालजींनी मला आत्म्यांना जागृत करून परमार्थमार्गी आणण्यास सांगितले, तेव्हा त्यांच्यासमोर मी माझी कमतरता मांडली. मी अश्रु ढाळत त्यांना म्हटले की,''या कार्यासाठी मी अपात्र आहे. जगाने सर्व संतांना सर्वप्रकारे त्रास देण्यात काही उणीव राहू दिली नाही. तर मग मी कसा बरे परमार्थाचा संदेश लोकांना देऊ शकेन?'' हसून महाराजजी म्हणाले, ''कुकर्मी मनुष्य जर त्याच्या दुष्कर्मांपासून मागे हटत नसेल तर सत्कर्मी मनुष्याने त्याच्या सत्कर्मांपासून फारकत का बरे घ्यावी?'' महाराज कृपालजींच्याच पाठिंब्यामुळे मी एका लहान मुलास सोबत घेऊन विश्वयात्रेसाठी बाहेर पडलो. गुरू नानकदेवजींनीदेखील हेच सांगितले आहे:

भक्तां ते संसारिया दा जोड़ कदे न आया।

सांसारिक लोकांवर विषय-विकार व स्वार्थरूपी विषाचा अंमल झालेला असतो, त्यामुळे त्यांच्या फायद्याची गोष्ट जरी एखाद्याने त्यांना सांगितली तरी त्यांना ती खटकते. त्यास मारण्याचा ते लोक प्रयत्न करतात. महाराज सावन सिंहजी सांगत असत ज्या मनुष्यास ताप आलेला असतो त्याच्या तोंडाची चव कडवट झालेली असते. त्यामुळे त्यास खाण्यासाठी खडीसाखर जरी दिली तरी त्याला ती आवडत नाही. ती कडू आहे असे म्हणत खडीसाखर घेण्याचे तो नाकारतो. वास्तविक पाहता ती खडीसाखर गोडच असते. अशा तऱ्हेने विषय विकारांच्या विषामुळे आपल्या मुखाची चव कडू झालेली असते.

संत सांगतात, ''प्रियजनहो! हे गुन्हे करणे तुम्ही सोडून द्या. यामध्ये तुमचाच फायदा आहे. एखादा गुन्हा करणे सोपे असते, परंतु त्यांची शिक्षा भोगणे अतिशय कठीण असते.'' ती शिक्षा भोगत असताना आपण रात्रं-दिवस परमात्म्यास दोष देत राहतो. परमात्म्याने आपल्याशी न्याय केला नाही असा आरोपही आपण करतो. परमात्म्याचे कोणाशीही वैर नसते. तो तर कृपेचा सागर आहे. तो सदैव आपल्यावर कृपेचा वर्षाव करीत असतो. परमात्माच आपल्यावर कृपा करणार नसेल, तर इतर कोण आपल्यावर कृपा करणार? परंतु त्याचा नियम असा आहे की,

कर्म जो-जो करेगा तूं वही फिर भोगना भरना।

आपण जी कर्मं करतो ती कर्मं करणारे व त्यांची फळे भोगणारेही आपणच असतो. गुरू नानकदेवजी सांगतात:

किसनूं दोष देते तू प्राणी सब अपना किया करारा हे।
बिन किए लागे नहीं किया न बिरथा जाए।

परमात्म्याचे प्रियजन जेव्हा आपणांस भक्तीचा संदेश देतात, तेव्हा तो ऐकणे देखील आपणांस जड जाते. आपले मुल चित्रपट पाहण्यास गेले, त्याने मद्यप्राशन केले तरी आपणांस त्याचे वाईट वाटत नाही, किंबहुना आपण खुश होतो. परंतु एखादे मुल भक्ती करू लागल्यास आपण दु:खी होतो. मुलास भक्ती करताना पाहून खुश होणारे पालक खरोखरच भाग्यशाली असतात. ते मुलास मदत करतात, पहाटे त्यास उठवितात आणि सांगतात की, मुला! तू ध्यान–अभ्यास कर, त्यातच आम्हांस आनंद लाभतो.

कबीर साहेबांनी सांगितले होते की, ज्या सांसारिक लोकांनी हजारो भक्तांची हत्या केली आहे, त्यांच्याकडून मदतीची काय अपेक्षा ठेवावी? गुरू नानकदेवजींना व्यवहारांतील समजच नाही, या विचाराने त्यांचे आई–वडिल अस्वस्थ असत. ते इतर लोकांना विनंती करीत की त्यांनी नानकदेवजींना शेती किंवा व्यापार करावा असे समजावून सांगावे. खरेतर असे सर्वच भक्तांसोबत घडत असते. कुणीतरी कबीर साहेबजींच्या आईंना म्हटले की, तुमचा मुलगा खूप सद्‌गुणी आहे, तेव्हा त्यांची आई म्हणाली:

सुनों देवरानी सुनों जेठानी अचरज एक भयो।
सात सूत इन मुंडयो खोऐ ये मुंडयो क्यों न मुयो।
जबकी माला लई नपूते तब ते सुख न भयो।

ज्या दिवसापासून याने नाम जपण्यास सुरुवात केली, त्या दिवसापासून आमच्या घरातून सुख लुप्त झाले आहे. घरच्यांच्या सुखाची यास परवा नाही. जगात इतर एवढी माणसे मरतात, हादेखील त्यांच्याप्रमाणे मरत का नाही? तुम्ही शांतचित्ताने विचार करून पहा! सकलजगाचा उद्धार करणाऱ्या गुरू नानकदेवजींचे डोके ठिकाणावर नाही असे म्हणत त्यांच्यावर उपचारासाठी मांत्रिक बोलाविला, वैद्यास बोलावले गेले. गुरू नानकदेवजी स्वत:च सांगतात:

वैद्य बुलाया वेदगी पकड़ ढ़िढोले बाँह।
भोला वैद्य न जाने कर्क कलेजे माँह।।

गुरू नानकदेवजींना जो आजार, जे दु:ख, जी तळमळ होती, त्याची वैद्यास काय कल्पना? ते वैद्यास म्हणाले:

रोग दारू दोनो जाणें ता नानक वैद्य सदाए।

अशा आत्म्याच्या अंतरातील आजाराबद्दल गुरूंना माहित असते की यांच्या अंतरात परमात्म्याच्या मिलनाची तळमळ आणि विरह आहे. त्यावर ते नामरूपी औषध देतात. ज्याच्या अंतरात परमात्मा प्राप्तीची ओढ व तळमळ असते, तो रात्री जागरण करतो आणि दिवसा त्याच्या हरवलेल्या वस्तूच्या शोधामध्ये अस्वस्थ होऊन फिरत राहतो. या आजाराचा जाणकार वैद्य भेटला तरच योग्य औषध मिळू शकते. कबीर साहेब सांगतात:

पापी भक्त न भावी हर पूजा न सुहाय।
मक्खी चंदन पर हरे जह दुर्गंध ते जाय।।

इतर सांसारिक लोकांनी भक्ती करणे दूरच, त्यांना भक्ती करणारेदेखील पसंद नसतात. तुम्ही इतिहास वाचून पाहा! आई–वडिल म्हणतात, मुलगा कामकाज करीत नाही, साधु बनून फिरत आहे. मित्रमंडळी म्हणतात, अरे मित्रा! तू कोठे भरकटत आहेस?

बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. कटहरा येथील एक चौधरी नाम घेऊन गेला. तो खूप विनोदी स्वभावाचा होता. तो मला म्हणाला, तुम्ही जर माझ्या गावात सत्संग केलात, तरच माझी सुटका होईल. कारण लोकं मला खूप छळतात. मी त्यास म्हटले की, तू त्यांना इकडेच घेऊन ये. मला काही कारणास्तव पंजाबला जायचे होते. तेव्हा परतीच्या प्रवासात मी कटहरा येथे येईन असे मी त्यास सांगितले. त्यानुसार आम्ही तेथे गेलो. तो चौधरी श्रीमंत होता. त्याची मित्रमंडळी माझ्याकडे आली व मला म्हणाली की, तुम्ही यास कोणत्या गैरमार्गी लावले आहे? तुम्हीच विचार करा! काय तो वाममार्गाला लागला होता का? तो तर भक्तीच करीत होता.



सतयुग, द्वापार, त्रेता युगांमधील लोकांचे विचार यापेक्षा काही चांगले होते असे नाही. चारही युगांमध्ये मन आणि आत्मा तेच आहेत. सतयुग, त्रेता, द्वापार युगांमध्ये थोड्याफार प्रयत्नांनी आपले मन परमार्थाकडे लागत असे. त्याकाळी लोकं जप–तप आणि संयम ठेवण्यावर अधिक महत्त्व देत असत. परंतु नामाची भक्तीच आपली परमात्म्याशी गाठ घालून देते. त्या काळीही जो कुणी नामाची भक्ती करीत असे, त्यास लोकांच्या विरोधास सामोरे जावेच लागत असे.

कबीर साहेब सांगतात की, मी जेव्हा त्रेता युगात आलो होतो, त्यावेळी रावणाची पत्नी, मंदोदरीस नाम प्राप्त झालेले होते. मंदोदरीची संगत कुणा नामधारकाबरोबर होती. तिला वाटत असे की, रावण शिवउपासक आहे तरीही त्यास शिवाकडून काय प्राप्त झाले? तिची अशी इच्छा होती की रावणास सत्पुरुषाचे दर्शन घडावे. मंदोदरीने रावणास सांगितले,''कबीर साहेब परिपूर्ण संत आहेत, तुम्ही कबीर साहेबांकडून नाम घ्यावे.''

कबीर साहेब मंदोदरीच्या घरी गेले असता, ते द्वारपालास म्हणाले मी रावणास भेटू इच्छितो. रावण अतिशय अहंकारी होता. त्यास शिक्षणाचा, राज्याचा, शक्तीचा, धन–संपत्तीचा आणि सैन्यबळाचा अहंकार होता. ज्याच्या अंतरामध्ये एवढा अहंकार असेल, त्यास साधुची भेट घेण्याची इच्छा कशी बरे होईल? कबीर साहेबांनी द्वारपालाकरवी जेव्हा रावणास भेटण्याचा निरोप पाठविला, तेव्हा रावण त्या द्वारपालास म्हणाला की, तू एका भिक्षुकाच्या सांगण्यावरून मला निरोप देण्यासाठी आलासच कसा? रावणास प्रचंड राग आला. तेवढ्यात कबीर साहेब त्याच्या समोर येऊन उभे राहिले.

त्यावेळी रावणाने कबीरसाहेबांवर तलवारीने सत्तर वार केले. त्याच्यासमोर कबीर साहेब हातात एक गवताची काडी घेऊन उभे राहिले व त्यांनी ते वार त्या गवताच्या काडीने अडविले. अखेरीस हसून कबीर साहेब रावणास म्हणाले, ''तू तुझ्या तलवारीची कमाल रामचंद्रास दाखव?'' येथे कबीर साहेबांची एवढीच चुकी होती की भक्तीचा संदेश देण्यासाठी ते स्वत:

रावणाच्या घरी गेले. पल्टू साहेब आपला स्वानुभव सांगतात की प्रत्येक युगामध्ये असे मोजकेच भाग्यशाली आत्मा या परमार्थ मार्गावर येतात.

भगत जगत से वैर है चारो जुग प्रमाण।
चारो जुग प्रमाण बैर जो मूस बिलाई।।

आपण उदाहरण देत आहात की, उंदीर दिसल्यानंतर त्याला पकडून खाण्याचे ट्रेनिंग मांजरीस कोण देते? उंदरास कोण शिकवते की मांजर तुझी वैरी आहे? मांजरीने केलेली 'म्याऊ' ऐकली किंवा त्यास नुसता वास जरी आला तरी उंदीर त्याच्या बिळाबाहेर येत नाही. निसर्गाने सुरुवातीपासूनच असे नियम तयार केलेले आहेत. ज्याप्रमाणे उंदीर आणि मांजराचे वैर असते त्याचप्रमाणे सांसारिक लोकं परमात्म्याच्या प्रियजनांचा विरोध करतात. ते कुणासही परमार्थमार्गी वळू देत नाहीत, आणि परमात्म्याकडे कुणी वळल्यास त्याचा छळ करतात.

निवर भुयंगम वैर कवल हिमकर अधिकाई।

मुंगुस आणि सापामध्ये वैर असते. मुंगुसास पाहून साप पळून जातो. जर साप दिसला तर त्यास मुंगुस जाऊ देत नाही. त्यांना कोण ट्रेनिंग देतो? परमात्म्याने बनविलेल्या नियमांना कुणी नष्ट करू शकत नाही. कबीर साहेब सांगतात,''धनाची निर्मिती झाल्यापासून, चोर ते लुटण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्याचप्रमाणे भक्तांचा विरोध करणारे त्यांच्या मागे लागलेले असतात.''

हस्ती केहर बैर बैर है दूध खटाई।

कबीर साहेब सांगतात की, हत्ती आणि सिंहाचे वैर असते. हत्तीस पाहून सिंह त्याच्यावर झडप घालतो. सिंहास पाहून हत्ती पळून जातो. दुधाजवळ एखादी आंबट वस्तु ठेवल्यास दूध नासते. त्याचप्रमाणे आपण आपल्या मनास या जगात रमविण्याचा तसेच वैराग्यदेखील प्राप्त करण्याचे ठरविल्यास तसे होऊ शकत नाही, कारण एका म्यानामध्ये दोन तलवारी राहू शकत नाहीत, केवळ एकच तलवार राहू शकते.

घर में रहतो भक्ति कर नहीं तो कर वैराग।
वैरागी होय बंधन पड़े ताँके बड़ो अभाग।।

एखाद्याने साधु बनून सन्यास घेण्याचे ठरवताना त्याचे मन सांगते की, चला, हे घरदार त्यागून भक्ती करावी. या जगाशी आपले काय देणे–घेणे? मग तो मनुष्य घरदार त्यागून निघून जातो. परंतु बाहेर गेल्यावर त्यास पुन्हा घर, पत्नी, मुले–बाळे सर्व आठवतात. त्यानंतर तो पुन्हा घरी परततो.

कबीरा ऐह मन मशकरा कहूँ तो माने रोश।

मनाविरुद्ध काही घडल्यास ते संतप्त होते. या मनाने मोठमोठ्या ऋषी–मुनींची थट्टामस्करी केलेली आहे. पुराणांमध्ये आपण वाचतो की, श्रृंगी ऋषी थोर होते. या जगाचा त्याग करून त्यांनी साठ हजार वर्षे घोर तपश्चर्या केली होती, आपण तर एक तासदेखील शांत उभे राहू शकत नाही.

एकदा राजा दशरथाच्या राज्यात भयंकर दुष्काळ पडला होता. त्याकाळी आजच्यासारखे पाणी पुरवठा करणारे कालवे नव्हते. या दुष्काळावरील उपाय राजा दशरथाने ज्योतिषांना विचारला असता, त्यांनी सांगितले की, श्रृंगी ऋषीने येथे येऊन यज्ञ–हवन केले तर पाऊस पडू शकतो. त्यावेळी श्रृंगी ऋषी शहरात येत नसे. त्यामुळे राजाने जाहीर केले की, जो कुणी श्रृंगी ऋषींना घेऊन येईल, त्यास मी थाळीभर मोती देईन.

ते ऐकून एका स्त्रीने वचन दिले की, मी श्रृंगी ऋषींना घेऊन येते. ऋषी कन्येचा वेष धारण करून ती स्त्री श्रृंगी ऋषीकडे गेली आणि ऋषी काय अन्न ग्रहण करतात, याचे तिने निरीक्षण केले. आपल्यासारखा वेष परिधान करून जर कोणी व्यक्ती आपल्यासमोर आली तर त्या व्यक्तीशी संवाद साधणे सोपे जाते. तिने निरीक्षण केले की, जेवण म्हणून ऋषी एका वृक्षास एकदा जिभेने चाटतात. ज्या जागेवर ऋषी चाटत असत त्या जागेवर, त्या स्त्रीने मध लावले. त्या मधुर चवीमुळे ऋषींच्या मनाने त्यांना सल्ला दिला की, चव स्वादिष्ट आहे. चवीचा आणखीन स्वाद घेण्याचे काम जिव्हा करू लागली. जेथे ऋषी वृक्षास एकदाच चाटत असत, त्याऐवजी ते अनेकदा चाटू लागले.

त्यानंतर त्या स्त्रीने वृक्षास मधाऐवजी शिरा लावण्यास सुरुवात केली. ऋषींना शिऱ्याची चव आवडली. दररोज शिरा ग्रहण करू लागल्यावर त्यांच्या शरीरात चैतन्य निर्माण झाले. जवळच ती स्त्री असल्याने, तिच्याशी केलेल्या संगाने मुले जन्मास आली. तिने ऋषींना सल्ला दिला की, आपला उदरनिर्वाह येथे होऊ शकत नाही. शहरात जाऊन आपण मुलांचे पालनपोषण करूया. त्यानुसार मुलांना उचलून घेऊन श्रृंगी ऋषी शहरामध्ये जाण्यासाठी निघाले.

मी ही कथा नेहमी अमेरिकेत सांगतो, कारण जसे अमेरिकन लोकं आपल्या मुलांना उचलतात त्याचप्रमाणे श्रृंगी ऋषीने त्यांच्या मुलांना उचलले होते. एक मुल त्यांच्या खांद्यावर, दुसरे कडेवर तर तिसरे मुल मुलांच्या ढकल गाडीत ठेवलेले असते. त्यामुळे ही गोष्ट ऐकून अमेरिकन लोकं हसतात आणि त्यांस माझे सांगणे सहज समजते.

अशा रितीने श्रृंगी ऋषी शहरात आले. त्यांनी होम–हवन केले. आपणांस कल्पना आहे की, इतरांची थट्टा करण्याची संधी कशी मिळते, याची जग वाटच पाहत असते. एकजण थट्टेने म्हणाला, आम्ही ऐकले होते की, श्रृंगी ऋषी खूप थोर आहेत, ते शहरात येतही नाहीत. परंतु यांची अवस्था तर गृहस्थी मनुष्यापेक्षाही बिकट झालेली आहे. यांना कितीतरी मुले आहेत. खरेतर मुनींचे लक्ष या जगात विखुरलेले नव्हते. त्यांची चूक त्यांच्या लक्षात आल्यावर पत्नी व मुलांचा त्याग करून ते पुन्हा जंगलामध्ये निघून गेले. परंतु अशा रितीने त्यांच्या मनाने एकदा तरी त्यांची थट्टा उडविली.

आपले मन त्याच्या हातून एकही संधी वाया घालवित नाही. हे जग आणि या जगातील वस्तुरूपी माया कधी व कसले रूप धारण करेल याची कुणास कल्पना नसते. कधी कोणी स्वत:च मायेच्या जाळ्यात अडकतो तर कधी इतर कोणामध्ये तरी संचारून मायेचे वाटप करू लागतो, त्यास वाटते आपल्याकडे कोण पहात आहे? चला आपण गुपचुप मायेचा वापर करूया! तर कधी कुणा स्त्रीच्या बंधनामध्ये अडकतो, स्त्रीचे रूप धारण करून माया येते. मन कोणतीही संधी वाया दवडत नाही.

अशाप्रकारे जाळ्यात सापडला नाही तर त्यास सत्ता हाती दिली जाते. जेव्हा सत्ता हाती येते तेव्हा ते अत्यंत आनंदीत होतो, त्याचा आनंद गगनात मावेनासा होतो. परंतु जेव्हा ती सत्ता गमावतो तेव्हा मात्र खूप दु:खी होतो. खरेतर ज्या वस्तूमध्ये आनंद प्रतित होतो, त्याच वस्तुमध्ये दु:ख दडलेले असते. घरात मुल जन्मास आल्यावर आपल्यास आनंदीआनंद होतो, परंतु तेच मूल मोठे होऊन नालायक निघाले वा त्यास परमात्म्याने लहान वयातच माघारी बोलावून घेतले तर किती दु:ख होते? तसेच विवाह झाल्याने पती–पत्नी खूप आनंदीत होतात. परंतु पतीचे निधन झाले, तर पत्नी अश्रू ढाळत बसते. जेवढे सुख सुरुवातीला वाटत होते, त्याहून जास्त दु:ख होते.

मायेच्या प्राप्तीने आपण खूप खूष होतो. विचार करू लागतो, कदाचित! आपल्याकडे विशेष कला–कौशल्य, हुषारी असल्यामुळेच माया लाभली आहे. परंतु तेच धन कोर्ट–कचेरी, आजारपण आणि डॉक्टरची फी भरण्यामध्ये खर्च होते. तेव्हा सुरुवातीला जेवढा आनंद झालेला असतो, त्याहूनही अधिक दु:खं आपणांस होते. हे जग क्षणभंगूर असून त्यातून मिळणारे सुख देखील क्षणिक (तात्पुरते) असते. संत प्रेमाने सांगतात, खरी सुख–शांती आपल्या खऱ्या घरी पोहचल्यावरच प्राप्त होते.

पल्टू साहेबांचा संदेश हाच आहे की आपण संसाराचा त्याग न करता त्यातच राहावे. आपण संसाराचा त्याग करावा असा संतांचा हेतू नसतो.

श्रृंगी ऋषींची गोष्ट तुम्हाला सांगण्यामागे माझा हाच हेतू होता की त्यांनी संसाराचा त्याग केल्यानंतरही त्यांना पुन्हा संसारात यावेच लागले. संसार त्यागून आपण कोठे जाणार? कारण पुढेही संसारच आहे. आपले स्वत:चे घर त्यागल्यानंतर दुसऱ्या एखाद्या डेऱ्याचा पहारा आपणांस करावा लागेल. आपल्या पत्नीचा त्याग केल्यास इतर लोकांच्या पत्न्यांसमोर अन्नासाठी हात पसरावा लागेल. गुरू नानकदेवजी सांगतात:

त्यागना त्यागना काम क्रोध लोभ मोह अंहकार त्यागना।
माँगना माँगना हर रस गुरू से माँगना।

आपण काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकाराचा त्याग करणे जरुरीचे आहे. सतगुरूंकडे नाम आणि नामाच्या रसाचे दान मागावे, कारण नामाशिवाय मुक्ती लाभत नाही. संत नामाचे भांडार घेऊन या जगात येतात. ते नामरूपी असतात. ते आपणांस नामाशी जोडतात आणि आपल्या अंतर्यात नामाचा प्रकाश निर्माण करतात.

भैंस घोड़ से बैर चोर पहरू से भाई।
पाप पुण्य से बैर अग्नि और बैर पानी।।

पल्टू साहेब सांगतात,''ज्याप्रमाणे चोर आणि पहारेकरी यांमध्ये वैर असते, अग्नी आणि पाणी यांमध्ये वैर असते. पाणी अग्नीस क्षणात थंड करते. याच प्रमाणे पाप आणि पुण्य यांच्यामध्ये वैर आहे. ज्या हृदयात नाम प्रगट होते, तेथून पाप आपला मुक्काम हटवते.''

सन्तन यही विचार जगत की बात न मानी।
पल्टू नाहक हुकता जोगी देखे स्वान।।

पल्टू साहेब प्रेमाने सांगतात, ''परमात्मा जेव्हा त्याच्या प्रियजनांना या जगात रवाना करतो, तेव्हा ते ज्या घरात जन्मास येतात, त्या घरातील माणसे त्यांची हजेरी घेतात. नंतर त्या घरात येणारे त्यांचे नातेवाईक त्यांना प्रेमाने समजावण्याचा प्रयत्न करतात, धमकीही देतात की तुला आतापासून भक्ती करण्याची काय गरज? भक्ती तर वृद्ध माणसे करतात.''

एका कुटुंबातील सर्व सदस्यांना नामदान मिळाले होते, फक्त एक म्हातारा नामधारी नव्हता. त्या म्हाताऱ्याची अवस्था पाहून कुटुंबियांना वाटले की हे अतिशय दु:खी आहेत, तेव्हा त्यांना बाबाजींकडे दर्शनासाठी न्यावे. ते त्या वृद्धास घेऊन येथे आश्रमात आले. त्यांनी मला सांगितले की प्रकृतीस्वास्थामुळे ते वरती येऊ शकत नाहीत, कृपा करून तुम्ही खाली आलात तर बरे होईल. मी खाली गेलो. सर्वप्रथम मी त्या वृद्धास विचारले, ''ऐका बाबा! तुमची तब्येत कशी आहे?'' तडकून त्या वृद्धाने उत्तर दिले,

''खूप चांगली आहे.'' मी जेव्हा त्यांना म्हटले, ''बाबा! परमात्म्याकडे लक्ष दे, राम-राम म्हण.'' तेव्हा तो वृद्ध भडकून म्हणाला, ''मी अगोदरच खूप दु:खी आहे आणि तुम्हाला रामाची पडली आहे.'' तुम्ही विचार करू शकता की जर वृद्ध लोकांनी नाम जपले असते, तर तरुणांना भक्तीमार्गाकडे वळण्याची गरज काय आहे? कारण वृद्ध लोकं नाम जपत नाहीत.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''आपण जर भाग्यशाली असलो तर बालपणीच भक्तीकडे वळतो. कारण त्यावेळी आपले लक्ष इतरत्र पसरलेले नसते व तारुण्यातला जोशही आपल्या शरीरात असतो. त्यानंतर भलेही आपण वृद्ध झालो तरीही आपले काही बिघडत नाही.'' ज्याचा परमार्थ पक्का झालेला असतो, ज्याचे लक्ष परमात्म्यावर एकाग्र असते, त्याच्यावर वयाचा काहीच परिणाम होत नाही. परमात्म्याचे प्रियजन जेव्हा या जगात येतात, तेव्हा ते सांसारिक लोकांचे सांगणे ऐकत नाहीत. ते त्रास सहन करतात.

भजन तेल की धार साधना अधके साधी।

पल्टू साहेब सांगतात की, परमात्म्याने संतांवर जबाबदारी सोपविलेली असते की त्यांनी परमार्थाचा प्रचार करावा. ते जगाची पर्वा करीत नाहीत. ते आपला ध्यान-अभ्यास करतात, कठीण ध्यान-साधना साधतात.

हंस चुगे न घोघी सिंह चरे न घास।।

परमात्म्याने प्रत्येक पशू-पक्षी, मनुष्य-राक्षस, सर्वांचीच **मर्यादा** ठरविलेली आहे. त्या मर्यादेच्या कक्षेत आपण बंदिस्त आहोत. सर्व आत्मे ज्या-ज्या योनीत असतात, त्या-त्या योनीतील ते **मर्यादा** पाळतात. केवळ मनुष्यच स्वत:ची मर्यादा पाळत नाही. ती मर्यादा म्हणजे काय? चौऱ्याऐंशी लक्ष योनी भोगल्यानंतर मनुष्य जन्माची लहानशी संधी आपणांस मिळालेली असते. जे कार्य आपण पशू-पक्ष्यांच्या योनीत करू शकत नाही, ते कार्य आपण मनुष्य जन्मात करू शकतो. ते कार्य म्हणजे परमात्म्याची भक्ती करणे व परमात्म्यास प्राप्त करणे. जर या मनुष्य जन्मात परमात्म्यास प्राप्त करू शकलो नाही, तर ही संधी पुन्हा कधी मिळेल ते सांगता येत नाही. कदाचित एखाद्या अशाही

जागी आपला जन्म होऊ शकतो, जेथे चुकूनही आपण परमात्म्याकडे जाऊ शकत नाही. महाराज सावन सिंहजी सांगत,''या जगात असे अनेक जाती–धर्म व प्रांत आहेत जेथील लोकांना परमात्मा म्हणजे काय हे माहीत नाही.''

मी कॅनडा येथे गेलो असता, मनसा सिंहच्या घरी आमचा सत्संग होता. तेथे काही हिंदुस्थानी प्रेमी मला भेटण्यासाठी आले, त्यांच्यामध्ये एक स्त्री होती. तिने माझ्यावर प्रश्नांचा भडिमार केला. ती वारंवार मला मांसाहारावर प्रश्न विचारत होती. ती वारंवार म्हणत होती की अशी अनेक ठिकाणे आहेत, जेथे खाण्यासाठी मांस–मच्छीशिवाय इतर काहीच उपलब्ध नसते. मग तेथे राहणारे, मच्छी खाणारे लोक पापी आहेत का? मी तिला म्हटले की आपण येथे राहत आहोत, जेथे केळे, संत्रे, सफरचंद तसेच सर्व प्रकारची धान्ये उपलब्ध आहेत. तेव्हा तू येथील गोष्टींबद्दल बोल. तुझा जन्म त्या ठिकाणी झालेला आहे का? तू जर त्या ठिकाणी जन्मास आली असतीस तर, ते अन्न खाण्यामध्ये तुझा काहीच दोष नाही.

वाघ मांस खातो, त्यात त्याचा काय दोष? त्याची दंत–रचनाच निर्सगाने त्यानुसार केलेली आहे. मांजर मांस खाते, त्यामध्ये तिचाही दोष नाही. कारण तिचीदेखील दंत रचना त्याप्रमाणेच आहे. परंतु परमात्म्याने मनुष्याचे दात मांस ग्रहण करण्यासाठी समर्पक बनविलेले नाही. मांस खाणाऱ्याचे दात टोकदार तर मनुष्याचे दात चपटे असतात. निसर्गास आपण आव्हान देऊ शकत नाही. परंतु आपण अशा विचित्र गोष्टींवर ठाम राहतो आणि परमात्म्याच्या मर्यादेपासून दूर जातो. कबीर साहेब सांगतात:

कबीरा मानस जन्म दुर्लभ है मिले न बारंबार।
ज्यों वन फल पक्के भोंये गिरे बहुर न लग्गे डार।।

जे फळ पिकून एकदा का जमिनीवर पडते, त्यास पुन्हा झाडावर लावले जाऊ शकत नाही. त्याचप्रमाणे एकदा का मनुष्यजन्म आपल्या हातून निसटला तर तो पुन्हा आपणांस मिळत नाही. चातक पक्षाची एक मर्यादा आहे, तो फक्त स्वाती नक्षत्रातील पाण्याचे थेंबच पितो, इतर पाणी प्राशन करीत

नाही. तो एक पक्षी असला तरी तो तहानेने व्याकूळ होऊन आपला प्राण सोडेल, परंतु इतर नदी–नाल्याचे पाणी प्राशन करीत नाही. चातक पक्षी म्हणतो की ही आमच्या कुळाची रीत आहे. मी इतर पाणी प्यायलो तर माझ्या कुळाचे नाव कलंकित होईल. कबीर साहेब सांगतात:

पपीहे का पन देखकर धीरज रही न रंच।
मरते दम जल में पड़ा तोहू न बोड़ी चुंज।।

एकदा मी गंगा नदीच्या किनाऱ्यावर फिरत होतो. तहानेने व्याकूळ एक चातक पक्षी पिरो–पिरो असे ओरडत त्या नदीत पडला व त्याने आपले प्राण त्यागले, परंतु त्याने अखेरपर्यंत नदीतील पाणी प्राशन केले नाही व स्वत:ची **मर्यादा** राखली. कमळाचीही एक **मर्यादा** आहे कि ते केवळ सूर्योदयानंतरच उमलते. आपण सूर्यफुल नेहमी पाहतो. जस–जसा सूर्य आभाळात फिरतो, तस–तसे ते फुल वळते. पशू–पक्ष्यांची आपआपली मर्यादा असते. परमात्म्याची भक्ती करणे, परमात्म्यास प्राप्त करणे, शाकाहाराचे पालन करणे ही मनुष्याची **मर्यादा** आहे, जिचे पालन मात्र मनुष्य करीत नाही. म्हणूनच पल्टूसाहेब जे काही या वाणीमध्ये सांगत आहेत, ते लक्षपूर्वक एकेण्यायोग्य आहे.

हंस चुगैं ना घोघी सिंह चरैं न घास।।
सिंह चरै ना घास मारि कुंजर को खाते।
जो मुरदा ह्वै जाय ताहि के निकट न जाते।।
वे न खाहिं असुद्ध रीत कुल की चलि आई।

आपण प्रेमाने सांगता की परमात्म्याने प्रत्येकाची आप–आपली **मर्यादा** ठरवून दिलेली आहे. राजहंस नेहमी मोतीच टिपतो, शिंपले वगैरे खात नाही. कारण ते खाल्ल्याने त्याचे कुळ कलंकित होते. तो आपल्या कुळाच्या मर्यादेचे पालन करतो. सिंह गवत तसेच मेलेल्या प्राण्याचे मांस खात नाही. तो स्वत: शिकार करून ताजे मांस खातो. त्याने मेलेल्या प्राण्याचे मांस खाल्ल्यास त्याच्या कुळास कलंकित व्हावे लागेल.

परमात्म्याने संतांचीदेखील **मर्यादा** ठरवून दिलेली आहे. जर ती **मर्यादा** त्यांनी ओलांडली, तर त्यांना देखील दोष दिला जातो. या जगामध्ये येऊन संत आपणा जिवांना आपली **मर्यादा** समजावून सांगतात.

एक गुरू आणि त्यांचा चेला वाटेने जात होते. चेल्याने गुरूंना विनंती केली,''महाराजजी! मला शांती लाभेल, माझ्या अंत:करणास गारवा मिळेल, असा काही उपदेश आपण करावा.'' गुरू म्हणाले, ''हे बघ मुला! तू विशेष (मोठा) व्यक्ती बनण्याचा प्रयत्न करू नकोस.'' खरे तर अर्थ समजून घेण्यासाठी ही क्षुल्लक गोष्ट आहे. ते दोघे जण पुढे मार्गक्रमण करीत राहीले. वाटेत त्यांना राजाचा महाल, त्याच्या सभोवतीची बाग दिसली. महालामध्ये सुंदर पलंग होते. ज्यांच्यावर आरामदायी गाद्या वगैरे अंथरलेल्या होत्या. ते सर्व पाहून तो चेला गुरूंना म्हणाला की, आपण काही वेळ येथे आराम करूया. गुरू चेल्यास म्हणाले,''हे कुणासाठीतरी अंथरले गेले आहे.'' त्यावर चेला म्हणाला,''नाही. आपणांस येथे कोण मनाई करेल?''

गुरू एका बाजूस जाऊन ध्यान-अभ्यासासाठी बसले. चेला पलंगावर आडवा पडला. त्याने अशा प्रकारच्या आरामदायक गाद्या कधी पाहिल्या नसल्याने त्यास पडल्या-पडल्या शांत झोप लागली. राजाचे नोकर महालामध्ये आले, तेव्हा त्यांना तो चेला पलंगावर झोपलेला दिसला. त्यांनी त्याचा कान पकडून त्यास उठविले आणि विचारले की तू कोण आहेस? येथे महालात येऊन कसा बरे झोपलास? चेल्याने उत्तर दिले,''मी साधू आहे.'' राजाच्या नोकरांनी त्यास खूप बदडले की साधू असून तू राजाच्या महालामध्ये नरम गाद्यांवर झोपतोस?

तो चेला गुरूंकडे गेला व त्यांना म्हणाला, ''त्यांनी मला खूप बदडले.'' तेव्हा गुरूंनी विचारले, ''बच्चू! तू काहीतरी तुझे मोठेपण त्यांना सांगितले असेल.'' चेला म्हणाला, ''मी त्यांना काहीच म्हटले नाही. त्यांनी मला विचारले की तू कोण आहेस?'' त्यावर मी उत्तर दिले की ''मी साधू आहे.'' गुरू म्हणाले, ''तू साधू बनलास म्हणूनच तुला मार खावा लागला.



तुझ्याकडे येण्याअगोदर ते माझ्याकडे आले होते. एक तर मी काही पलंगावर झोपलेलो नव्हतो. त्यांनी जेव्हा मला विचारले की तू कोण आहेस? तेव्हा मी म्हणालो की, मी एक वाटसरू आहे. प्रवासाने थकवा आला म्हणून जमिनीवर बसून थोडा आराम करीत आहे. त्यामुळे गरीब मनुष्य समजून त्यांनी मला सोडून दिले.''

संत येथे येऊन आपणांस या जगाची **मर्यादा** समजावून सांगतात आणि हे देखील समजावतात की प्रियजनहो! तुम्ही कुणी विशेष व्यक्ती बनण्याचा प्रयत्न करू नका. नाहीतर तुमची अवस्था त्या चेल्यासारखी होईल. आपण साधू नसूनही साधू बनण्याचा अहंकार करतो. गुरूसाहेबांची ही वाणी आपणांस एक मार्गदर्शक इशारा आहे, जो आपण समजून घ्यावयास हवा. जर तो मार्गदर्शक इशारा आपण समजून घेतला नाही, त्यानुसार अंमलबजावणी केली नाही, तर तो दोष आपल्यावर येतो. आपण स्वत: ध्यान-अभ्यास करीत नाही आणि इतरांना ध्यान-अभ्यास करण्यास सांगितले तर तो दोष आपल्यावर येतो. आपल्या अंतरात एक शक्ती आहे, जिला आपण शांत जरी बसलेले असू तरी आपण का शांत आहोत याचे ज्ञान त्या शक्तीला असते. आपण जेव्हा बोलत असतो, तेव्हा ती शक्ती पाहत असते की हा बोलतो काय आणि स्वत: करतो काय? कबीर साहेब सांगतात:

राम झरोखे बैठके सबका मुजरा ले। जैसी जांकी भावना, वैसा ही फल दे।।

जेव्हा कुणी खरा साधू बनतो, तेव्हा तो असे कधीच म्हणत नाही की मी साधू आहे. तो म्हणतो मी तर तुमचा सेवादार आहे. खूप दिवसांपूर्वीची गोष्ट आहे, मला एका इंग्रजी प्रेमीने पत्र लिहिले की मी जगामध्ये संतांचा खूप शोध केला आहे. त्यासाठी मी चीन, जपान आणि इतर अनेक देशांमध्ये गेलो तसेच महात्मा बुद्धांच्या सेवकांनादेखील भेटलो. तुम्ही माझे होणारे गुरू आहात का? हे जाणून घेण्यासाठी मी तुम्हाला पत्र लिहित आहे. मी त्यास प्रेमाने म्हटले की मी गुरू नाही. मी तुझ्या आत्म्याची सेवा करण्यास तयार आहे. तुला जर माझ्या सेवेचा फायदा करून घ्यायचा असल्यास, तो तू करून घे, ती तुझी मर्जी आहे. सर्व महात्म्यांच्या वाणीमध्ये नोंद आहे:

नानक दास यही सुख मांगे मोको कर सन्तन की धूरे।

साधू साधना करतात. जगात पसरलेले लक्ष शरीराच्या नऊ द्वारांतून काढून नेत्रांच्या मागील बाजूस एकाग्र करतात. स्थूल, सूक्ष्म आणि कारण हे तिन्ही पडदे दूर सारून ते पारब्रह्ममध्ये पोहचतात. गुरू रामदासजी सांगतात:

साधु साध साध जन नीके जिन अंतर नाम धरीजे।
परसन परस भये साधु जन जन हर भगवान दखीजे।।

अशा साधुंच्या चरणी बसणे म्हणजे परमेश्वराच्या चरणी बसण्यासमान आहे. अशा साधुंशी हात मिळविणे म्हणजे परमेश्वराशी हात मिळविण्यासारखे आहे. असे साधु भेटणे किती अवघड असते? फरीद साहेब सांगतात:

दर दरवाजे जायके क्यों डिट्ठा घड़ियाल।
ऐह निर्दोषा मारिए हम दोषा दा क्या हाल।।

फरीद साहेबांनी घंटा वाजताना पाहिली. पहारेकरी प्रत्येक प्रहरास घंटा वाजविण्यासाठी हातोड्याने त्यावर प्रहार करतात. ते पाहून फरीद साहेब म्हणतात, याने काही चूक केली नसतानाही त्यावर प्रहार केला जातो, आपण तर रात्रं-दिवस चुका करीत असतो.

काले मेरे कपड़े काला मेरा वेश।
गुनही भरया मैं फिरा लोक कहन दरवेश।।

मी तर गुन्ह्यांनी भरलेलो आहे. माझ्या गुन्ह्यांचा मळ कुणी साफ करणारे असतील तर ते गुरू आहेत. त्यामुळे त्यांचा मी आभारी आहे. त्यांनाच आपण खरे साधू म्हणू शकतो.

पल्टू साहेब प्रेमाने सांगतात की संतांसाठीही **मर्यादा** आखलेल्या आहेत. संत नामाचे मोती टिपतात, मायेचा चारा खात नाहीत. संत सिंहासारखे धारिष्ठवान आणि तत्वनिष्ठ असतात, ते स्वमेहनतीने कमाई करूनच स्वत:चा उदरनिर्वाह करतात. इतर लोकांच्या कमाईच्या धनाचा वापर ते स्वत:साठी करीत नाहीत, कारण त्या धनाचे अन्न खाणे म्हणजे मुडदा खाण्यासमान असते. परमात्म्याने संतांना जी **मर्यादा** घालून दिलेली असते, नामाची कमाई करणारे संत त्या मर्यादेचे पालन करतात.

खाये बिनु मरि जाहिं दाग ना सकहिं लगाई।।

सिंह उपाशी मरेल परंतु इतर प्राण्याने शिकार करून राहिलेले मांस तो खात नाही, कारण ते खाल्ल्याने त्याच्या कुळास कलंकित व्हावे लागेल.

सन्त सभन सिरताज धरन धारी सो धारी।

परमात्म्याने संतांना सकल सृष्टीचा कर्ताकरविता बनवून जगात पाठविलेले असते. परमात्म्याच्या हुकूमावरूनच संत पृथ्वीवर येतात. त्यांनी सगुणरूप धारण केलेले असते, अंतरातून ते निर्गुण परमात्म्यामध्ये सामावलेले असतात.

नई बात जो करैं मिलत है उनको गारी।।

भीख न माँगै सन्त जन कहि गये पल्टूदास।

हंस चुंगै ना घोंघी सिंह चरैं ना घास।।

पल्टूसाहेब सांगतात राजहंस शिंपले न खाता मोती टिपतो. सिंह स्वत: शिकार करून खातो व स्वत:च्या कुळास कलंकित होऊ देत नाही, याचप्रमाणे संत स्वमेहनतीच्या कमाईतून स्वत:चा उदरनिर्वाह करतात. कारण त्यांनी या मर्यादेचे पालन केले नाही, तर त्यांनाही दोष लागतो. ही **मर्यादा** कुणी संतांनी स्वत:साठी घातलेली नसून, परमात्म्याने स्वत: ती बनविलेली आहे. सर्वकाही परमात्म्याच्या हातात असते.

जे महात्मा नाम–कमाई करतात, त्यांचा स्वभाव निसर्गत:च निश्चल असतो. ते इतरांपुढे हात पसरत नाहीत की मुला–बाळांच्या पालन–पोषणासाठी किंवा इतर गरजा भागविण्यासाठी मला तुम्ही भीक्षा द्या.

कबीर साहेब सांगतात की संत संगतचे भले करण्याच्या हेतूने नेक सल्ला देतात की तू नेक कामासाठी दान दे. म्हणूनच संतांनी तन, मन आणि धनाची सेवा ठेवलेली आहे. आपण संगतची सेवा करतो, संगतसाठी सतरंज्या अंथरतो, जेवण बनवितो, जेवण वाढतो, शेतीकाम करतो, ही सर्व तनाची सेवा आहे. मनाची सेवा म्हणजे संतांनी दिलेल्या नामाचे स्मरण करणे, वाईट विचार न करणे ही आहे. सत्संगी असून वाईट विचार करणे म्हणजे आपण संतांची सेवा न करता मनाची सेवा करण्यासमान आहे. आपण धनामधील मोह दूर सारला पाहिजे व इतरांना मदत केली पाहिजे. आज जे काही धन परमात्म्याने आपणांस दिलेले आहे, ते यापूर्वी इतर कुणाचे तरी होते, त्याचा सदुपयोग करण्यामध्येच आपला फायदा आहे.

बाबा सावन सिंहजी सांगत असत की ते पेशावर येथील बाबा कान्हकडे जात असत. महाराज कृपालदेखील बाबा कान्हकडे जात असत. ते २–३ रुपये बाबा कान्ह यांच्या चरणी ठेवत असत. त्या काळी चलन अतिशय मौल्यवान होते. ते रुपये सुट्टे करून बाबा कान्ह ते लहान मुलांना वाटत असत. महाराजजींनी सांगितले की लढाईच्या काळात वाढीव पगार मिळत असे. तसेच सर्व पगार एकत्र जमा होत असे. ते जेव्हा घरी परत येत असत तेव्हा सर्व रक्कम एकत्र मिळत असे. मी स्वत: लढाईमध्ये लढलेलो आहे. मला तेथील मर्यादेची कल्पना आहे. महाराजजी लढाई करून जेव्हा परत आले तेव्हा त्यांना जास्त पैसे मिळाले होते, त्यावेळी बाबा कान्ह म्हणाले की मला चमकदार, गोल–गोल खूप नाणी हवीत.

महाराजजी हसून म्हणाले, ''बाबा! तुम्ही तर लालची झाला आहात.'' अगोदरच मी सर्व पैसे त्यांच्यासमोर ठेवले होते. बाबा कान्ह म्हणाले,''तू हे पैसे उचल, तुझे हृदय दुखावेल.''मी म्हणालो,''माझे हृदय दुखावणार नाही.

मी तर आनंदाने तुमच्यासमोर पैसे ठेवले. बाबा कान्ह म्हणाले,''माझी इच्छा आहे की तुझे धन पवित्र व्हावे, मी तुझे पैसे घेऊन काय करू?''

बाबा कान्ह यांनी ते रुपये सुट्टे करवून घेतले. माझ्या उभ्या-उभ्याच तेथे मुले आली. त्यांनी बाबा कान्हच्या खिशातून पैसे काढून निघून गेले, काही मुलांनी तेथील गोणीखाली ठेवलेले पैसे देखील काढून नेले. मुलांना कल्पना होती की जेव्हा कुणी बाबाजींना पैसे देतो, तेव्हा ते पैसे आम्हालाच देतात. संतांकडे असे गरजवंत प्रेमीदेखील येतात. म्हणूनच संत आपल्याकरवी असे उपकार करवून घेतात. कबीर साहेब सांगतात:

मर जाऊं मांगू नहीं अपने तन के काज।
परमार्थ के कारणे मोहे न आवे लाज।।

एकदा मी बाबा बिशनदासजींच्या चरणी गेलो. त्यांच्याकडे एक महिला आली. बाबा बिशनदासजींनी त्या महिलेस विचारले,''तू तुझ्या मुलीचा विवाह करून दिलास काय?'' त्या महिलेने उत्तर दिले आम्ही अतिशय अडचणीत आहोत. आमच्याकडे पैसे नाहीत. बाबा बिशनदासजींनी मला सांगितले की या मुलीचा विवाह करून दे. त्याकाळी चलनाचे खूप मूल्य होते. दोनशे रुपयांमध्ये त्या मुलीचा विवाह झाला. त्या मुलीस म्हैस, बरेच कपडे आणि दागिनेदेखील दिले. माझ्या अंदाजाने आजकाल तसे लग्न पाच-सहा लाख रुपये खर्च करूनही होणार नाही, जे त्यावेळी दोनशे रुपयांमध्ये झाले.

पल्टू साहेबांनी या वाणीत आपणांस अनेक पद्धतींनी समजावले आहे. आपलेदेखील कर्तव्य आहे की आपण ध्यान-अभ्यास व नामस्मरण करावे, स्वमेहनतीने कमाई करून साधू-संगतची सेवा करावी आणि आपले जीवन सफल करावे. पशू-पक्षीदेखील मर्यादेचे पालन करतात. मनुष्यजन्मात येऊन आपण मर्यादेचे पालन करावे. ती **मर्यादा** म्हणजे परमात्म्याची भक्ती आहे. ज्या परमात्म्याने आपणांस जन्म दिला, त्याची आठवण सदैव आपल्या अंत:करणात ठेवावी, त्याच्यासाठी दररोज तास-दोन तास वेळ काढावा.

***

आज्ञेचे पालन

परमसंत अजायब सिंह महाराजांनी प्रेमींना सांगितलेली एक अविस्मरणिय घटना
संतबानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान



दुसऱ्या विश्वयुद्धात हिटलर आपले सैन्य घेऊन आगेकूच करीत होता. त्याच्या सैन्यास रोखणे अशक्य झाले होते. त्यावेळी भारतीय लोक सैन्यात भरती होण्यास तयार नव्हते. त्यांना खात्री होती की सैन्यात भरती झाल्यास त्यांचा मृत्यु अटळ आहे, ते घरी परतू शकणार नाहीत. लोकांना बळजबरीने सैन्यात भरती केले जात होते. लोक युद्धात जाण्यास इतके घाबरलेले होते की त्यांना वीस वर्षे तुरूंगात जाऊन राहणे सोपे वाटत होते. त्यांना वाटायचे की सैन्यात भरती होणे हे आत्महत्या करण्यासमान आहे.

मला एका महात्म्यांनी सांगितले होते की एखादा मनुष्य जर सैन्यात लढाई करताना मृत्यु पावला तर त्यास स्वर्ग प्राप्त होतो. मला स्वर्ग पाहण्याची इच्छा होती. जेव्हा सैन्यात भरती करणारी तुकडी आमच्या गावात आली तेव्हा आमच्या गावातून मी एकटाच सैन्यात भरती झालो. त्यावेळी माझे वय निव्वळ अठरा वर्षेदेखील नव्हते.

युद्धात जाण्यासाठी माझी पाळी अजुन आली नव्हती व मला तसा आदेशही दिला गेला नव्हता, तरीही मी स्वखुशीने आपले नाव युद्धात जाण्यासाठी नोंदविले. सैन्यातील वरीष्ठ अधिकाऱ्यांनी माझी हिंमत पाहून म्हटले,''हा अजुन वयाने लहान असूनही युद्धात जाऊन स्वत:चे बलिदान देण्यास तयार आहे.'' त्यावेळी माझ्या अंतरात खूप धैर्य होते, मला मृत्युचे भय नव्हते. मी कोणत्याही संकटाच्या सामोरे जाण्यास तयार होतो.

सैन्यात भरती झाल्यावर एका महिन्यातच आम्हांस युद्ध–आघाडीवर पाठविले जाणार होते. त्यावेळी आम्हा सर्वांची वैद्यकिय तपासणी केली गेली. डॉक्टरने तपासणी करून कोणकोणत्या जवानांना दूध पिणे गरजेचे आहे ते दर्शविले. त्याकाळी सैनिकांना दूधाचे शिधावाटप होत असे. आमच्या कमांडरने खिन्नतेने म्हटले,''हे सर्वच बळीचे बकरे आहेत, मला वाटते की तुम्ही सर्वांसाठीच दूध लिहून द्यावे.''

मी खूप धैर्यवान होतो, मला मृत्युची किंचितही चिंता नव्हती. मला माहित होते की मृत्यु तेव्हाच येतो ज्याक्षणी व ज्यात-हेने आपल्या नशिबात तो लिहिलेला असतो. मला सैन्यात भरती होण्याचा जराही पस्तावा नव्हता.

मी जेव्हा पुन्हा बाबा बिशनदासजींकडे गेलो, तेव्हा मी त्यांना सैन्यात भरती होण्याचा हेतू सांगितला. ते म्हणाले,''स्वर्गातही जन्म–मृत्यु, प्रेम–शत्रूत्व इत्यादी सर्व गोष्टी आहेत. ज्याप्रमाणे धरतीवर भौतिक शरीर आणि भौतिक रस–भोग आहेत, त्याचप्रमाणे स्वर्गातही सूक्ष्म शरीर आणि सूक्ष्म रस–भोग आहेत. जोपर्यंत रस–भोग आणि शरीर आहेत, तोपर्यंत मन शरीराशी जुडलेले आहे. जेथे मन आहे, तेथे शांती व संतुष्टी नाही.''

त्यांनी मला स्वर्गाचा राजा इंद्रदेवाची कथा सांगितली. जेव्हा इंद्र देवाची कामवासनेची कोणत्याही दैवी अप्सरेपासून संतुष्टी झाली नाही तेव्हा त्याची नजर एका ऋषीच्या पत्नीवर पडली. इंद्राने कामवासनेची पूर्ती करण्यासाठी धरतीवर मनुष्याचे रुप धारण करून ऋषीच्या पत्नीचे सत्वहरण केले आणि आपल्या जीवनातील शांती गमावली.

ऋषीची पत्नी परमेश्वराची भक्ती करीत असे. ऋषीने राजा इंद्रास शाप दिला ज्यामुळे राजा इंद्रास आपले स्थान व देश सोडून जावे लागले. जेव्हा स्वर्गाच्या राजाची ही परिस्थिती आहे तर मग स्वर्गात रहाणाऱ्या इतर लोकांची काय परिस्थिती असावी?

बाबा बिशनदासजींनी मला सांगितले की लोकं स्वर्गात जाण्यासाठी जप–तप तसेच सत्कर्मं करतात. परंतु सूक्ष्म रुपात रहात असूनही तेथील लोकं शारीरिक भोग–विलास करतात. जेथे भोग–विलास आहेत तेथे शांती व संतुष्टी नसते, तर मग स्वर्गात जाण्याचा काय फायदा?

मी सैन्यात आज्ञेचे पालन करणे तसेच अनुशासनात रहाणे शिकले. हे सर्व मनुष्याच्या स्वत:च्या आकलनशक्तीवर अवलंबून असते. सैन्यात असा नियम असतो की जे आपल्याला काम दिले जाते, सर्वप्रथम तुम्ही ते काम करावे आणि जर त्याकामाविषयी तुमच्या मनात काही शंका असेल किंवा द्विधा मनस्थिती असेल तर त्याविषयी नंतर विचारा. जर तुम्ही खोटी सबब देत राहिलात तर तुमचे वरिष्ठ अधिकारी तुमच्यावर नाराज होतील. सैन्यात जे आज्ञेचे पालन करीत नसत त्यांना शिक्षा दिली जात असे किंवा त्यांना घरी परत पाठविले जात असे. मी माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आज्ञेचे पालन करून त्यांची खुशी प्राप्त केली.

सत्संगातदेखील हेच सांगितले जाते की तुम्ही आज्ञेचे पालन करा आणि अनुशासनात रहा. 'नामदान' देताना अनेक गोष्टी समजावून सांगितल्या जातात की आज्ञेच्या सीमारेषेच्या आत राहण्यालाच अनुशासन म्हणतात. संतमतात आपल्याला एका सैनिकाप्रमाणे शौर्यवान बनावे लागते. ज्याप्रमाणे आपण दु:खी–कष्टी असलो तरी आपली सांसारिक आणि सरकारी कामं करतो, त्याचप्रमाणे आपल्या अंतरात सदैव सतगुरूंचे भय असले पाहिजे आणि आपण सदैव सतगुरूंच्या **आज्ञेचे पालन** केले पाहिजे.

आज्ञेचे पालन करणे व अनुशासनात रहाणे या दोन सवयींनी माझ्या जीवनात मला खूप मदत केली. याच सवयींमुळे जेव्हा मी आपल्या गुरूंना भेटलो, त्यांनी मला जे काही करण्यास सांगितले, ते मी करू शकलो.

सैन्यात ट्रेनिंगच्या वेळी आम्हांस बंदुक चालवायला शिकवत असता समजावले गेले होते की आपणांस बंदुकीचा अचूक नेम साधायचा असेल तर बंदुक चालविताना सर्वप्रथम आपले शरीर, बंदुक आणि लक्ष्य (निशाण) एका लाईनीत ठेवावेत. त्यानंतर न हलता आपला श्वास रोखून एकाग्रचित्ताने बंदुकीच्या पुढच्या आणि मागच्या दोन्ही नेम साधण्यासाठी सहाय्यक भागांच्या मधून पाहावे आणि दोन्ही डोळ्यांच्या नजरेस एका लाईनीत सरळ ठेवून हळूच चाप ओढावा. जे शिकाऊ सैनिक शिकविलेल्या पद्धतीनुसार गोळी झाडत असत ते नेम साधण्यात यशस्वी होत असत. जे सैनिक आपले ध्यान, शरीर, बंदूक आणि निशाण एका लाईनीत ठेवत नसत किंवा अस्थिर रहात असत ते नेम साधण्यात यशस्वी होत नसत.

ध्यान–अभ्यासाच्या बाबतीत देखील हेच तत्व लागू होते. जेव्हा आपण ध्यान–अभ्यासासाठी बसतो तेव्हा दोन्ही डोळ्यांच्या मध्यभागचे स्थान हे आपले निशाण असते. ज्याप्रमाणे सैन्यात बंदूक चालविताना आपले शरीर, चित्त आणि मन एकदम स्थिर ठेवावे लागते, त्याप्रमाणे ध्यान–अभ्यासात बसताना देखील शरीर, चित्त आणि मन अत्यंत स्थिर करावे लागते. जर आपण आपले ध्यान योग्य रीतीने दोन्ही डोळ्यांच्या मध्यभागी नीट एकाग्र केले तर काही बैठकांमध्येच आपली आंतरिक प्रगती होऊ लागते.

सैन्यात आम्हाला एक इंच जागेत पाच गोळ्या माराव्या लागत असत. वारंवार निशाणा बदलणारे यशस्वी होत नाहीत. मी सदैव एकच निशाणा साधला. याच सवयीने संतमतात माझी खूप मदत केली. गुरू आपणास सांगतात,''प्रियजनहो, जर तुम्ही संतमतात यशस्वी होऊ इच्छित असाल तर तुम्ही आपले ध्यान एकाच जागी एकाग्र करा.''

सैन्यात निरनिराळ्या तऱ्हेची माणसे असतात. त्यातील काही मद्यपान करीत असतात, काही वेश्यांकडे जातात, अश्लील भाषा वापरतात आणि शिवीगाळ करतात. मला अजुनही आठवते की सुरवाती–सुरवातीला ते रात्री दारू पिऊन नाचत असत, शिवीगाळ करीत असत आणि माझ्या

पलंगाजवळ देखील येत असत. ते मला त्यांच्यात सामिल होण्यासाठी सांगत असत, परंतु मी कधीही त्यांच्या कोणत्याही कृत्याने प्रभावित होत नसे. मी डोक्यावरून चादर पांघरून झोपून जात असे. ते कधी–कधी माझ्या डोक्यावरून चादर खेचून नेण्याचा प्रयत्न करीत असत, परंतु मी त्यांना माझ्यावरून चादर काढून टाकू देत नसे.

आम्ही सर्व सैनिक एक मोठ्या बराक (पुष्कळ माणसांनी एकत्र झोपण्याच्या खोलीत) रहात होतो. जेव्हा त्यांना कळून चुकले की मी त्यांच्यासारखा नसून मी परमेश्वराची भक्ती करतो, तेव्हा ते इतके प्रभावित झाले की त्यांनी मला त्रास देणे थांबविले. काही दिवसांनी त्यांनी बराकीत दारू पिण्याची हिंमत केली नाही. ते बराकी बाहेर जाऊन दारू पिऊ लागले.

जर आपण बसून नामस्मरण करीत असू व काही लोकं आपल्या जवळ बसून एकमेकांशी गप्पा मारीत असतील आणि आपण त्यांच्या गप्पांवर लक्ष देत असू किंवा ते गप्पा मारतात म्हणून त्यांच्याविषयी गैर विचार करीत असू तर आपण भक्ती करीत नसतो.

जर आपण नामस्मरण करीत राहून त्यांच्या गप्पांकडे लक्ष दिले नाही तर काही वेळाने त्यांना आपोआपच उलघडा होईल की ते चुकीचे कार्य करीत आहेत, कारण परमात्मा त्यांच्या अंतरात देखील विराजमान आहे. जर आपले नामस्मरण पक्के असेल आणि आपण स्वत: दृढनिश्चयी असलो तर मग आपल्या जवळ बसून किती लोकं गप्पा मारीत बसले आहेत याचा काही फरक पडत नाही. परमात्मा त्यांना गप्प करेल आणि ते स्वत:हूनच बाहेर निघून जातील. परमात्मा कोणत्या ना कोणत्या मार्गाने आपल्यासाठी सोपी व सुलभ परिस्थिती निर्माण करेल जेणेकरून आपण जास्तीतजास्त नामस्मरण करू शकू. जर मी त्या लोकांना म्हटले असते की मी ध्यान–अभ्यास करीत आहे तेव्हा तुम्ही गप्प बसा, तर त्यांनी आणखी मोठ्याने गोंगाट करून मला त्रास दिला असता. मी त्यांच्याकडे लक्षच दिले नाही, आपले काम करीत राहीलो.

मला लोकांबरोबर भेटी–गाठी करीत राहण्याची सवय नव्हती. मी कधीही पत्त्यांचा किंवा शतरंजाचा (आकडा किंवा फासा टाकण्याचा) डाव खेळलो नाही. मी गर्दी–जमावाच्या ठिकाणी बाजारात किंवा शहरांमध्ये जात नसे. जर मला कपडे, साबण व इतर वस्तू विकत घेण्याची गरज भासली तर मी त्या वस्तू आपल्या मित्राकरवी मागवून घेत असे. लोकं माझी थट्टा–मस्करी करीत म्हणत असत की,''जर तुला या संसाराविषयी व संसारातील चालचर्येविषयी काही माहित नाही तर तू या संसारात का आलास?''

मी आपल्या जीवनात कधी सिनेमा पाहण्यासाठी गेलो नाही. सैन्यात आम्हाला दर रविवारी फुकट सिनेमा दाखविला जात असे. सर्वजण सिनेमाची स्तुती करीत मला म्हणत असत,''सिनेमा तर खूप चांगला मनोरंजक असतो आणि त्यासाठी पैसेदेखील द्यावे लागत नाहीत, तर मग तू सिनेमा का पाहत नाहीस?'' माझे वरिष्ठ अधिकारी देखील मला विचारत असत की, ''तू सिनेमा पाहण्यासाठी का जात नाहीस?'' ते जेव्हा मला सिनेमा पाहण्यासाठी प्रेरित करीत असत तेव्हा मी त्यांस अंतर्यातील सिनेमा पाहण्यासाठी प्रेरित करीत असे. मी त्यांस सांगत असे की,''जर विष फुकट जरी मिळाले तरी त्याचे प्राशन केल्याने दुष्परिणामच होतो.''

मी असे म्हणत नाही की हा संसार वाईट आहे, परंतु मी त्यास आपलासा करू इच्छित नाही. आधुनिक वस्तू मनुष्यास बहिरमुखी बनविते. मी अंतरमुखी बनण्याचा प्रयत्न करीत होतो. सिनेमा पाहिल्याने सांसारिक तरंग आपल्या सत्त्वबुद्धीवर परिणाम करतात आणि आपले मन बाह्यजगातील गोष्टींमध्ये विखुरले जाते. जर आपण सिनेमा पाहत राहिलो तर आपणांस ध्यान–अभ्यासात तिच सिनेमातील चलचित्रे दिसू लागतात.

जर आपणांस खऱ्या अर्थाने सुंदरता व शांती प्राप्त करावयाची असेल तर एका जागी बसून स्वत:च्या अंतर्यात पाहण्याचा प्रयत्न करा, अंतर्यात अत्यंत सुंदर गोष्टी आहेत. बाह्यजगातील मनोरंजक कार्यक्रमात आपण दोन–तीन तासांमध्ये थकून जातो, परंतु अंतर्यातील मनोरंजन असे आहे

की ज्यास पाहून कधीच थकवा येत नाही. मी अंतर्यात जाऊन तो जिवंत सिनेमा पाहण्याचा प्रयत्न करीत होतो, ज्याचे थेट प्रसारण माझ्या अंतर्यात अखंड चालू होते, म्हणूनच मी बाह्यजगातील सिनेमा पाहू इच्छित नव्हतो.

लोकं सिनेमा पाहण्यासाठी चित्रपटगृहात जातात, खरेतर स्क्रीनवर जे काही दाखविले जाते ते बिलकुल खरे नसते. वाईट सिनेमा आपल्या विचारांना बाह्यजगात विखुरतो. आपण अंतर्यातील गोष्टींवर लक्ष देत नाही आणि खोट्या काल्पनिक गोष्टींवर आपला मौल्यवान वेळ व्यर्थ घालवितो. मी आपल्या कमांडिंग ऑफिसरकडे विनंती करीत असे की सिनेमा पाहण्याऐवजी मला एखादे काम दिले जावे. माझे ऑफिसर मला सांगत असत,''जर तू सिनेमा पाहू इच्छित नसशिल तर जाऊन आराम कर.'' मी बसून 'हे राम' 'हे गोविंद' असा जप करीत असे.

मला 'नामदान' मिळाले नव्हते तरीही माझे विचार बाह्यजगात विखुरलेले नव्हते. मी जेव्हाही ध्यान-अभ्यासासाठी आपले डोळे बंद करीत असे, मला अंतर्यात फार सुंदर गोष्टी दिसत असत. एखादा व्यक्ती थोडासा जरी अंतर्यात गेला आणि अंतर्यातील चुणुक जरी पाहिली तर तो बाह्यजगातील सिनेमा पाहणार नाही. अंतर्यातील गोष्टी खूप सुंदर व चित्ताकर्षक आहेत. मला अंतर्यात खूप सुंदर अनुभव होत होते. मला माहित नव्हते की मला कोणत्या दिशेला गेले पाहिजे.

जेव्हा एखादा व्यक्ती सैन्यात भरती होतो तेव्हा जे लोक अगोदरपासून सैन्यात असतात ते आपल्या सारखी विचारधारणा असलेल्या लोकांची संख्या वाढवू इच्छितात. मांसाहार करणारे मांसाची स्तुती करतात. मद्यपान करणारे मद्याची स्तुती करतात. परंतु दृढनिष्चयी लोकांवर कोणीही बळजबरी करीत नाही. माझा स्वानुभव आहे की:

जहाँ चाह वहाँ राह।

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती

मुंबई शहरातील सत्संगाचा कार्यक्रम

गुरुप्रिय साधुसंगत,

परमसंत अजायब सिंहजी महाराजजींच्या अपार कृपेने यंदा मुंबई शहरात सत्संगाचा कार्यक्रम **बुधवार दि. ३ जानेवारी २०१८ पासून रविवार दि. ७ जानेवारी २०१८** पर्यंत खालील पत्त्यावर होईल. सर्व गुरूप्रेमी बंधु-भगिनींच्या चरणी नम्र विनंती आहे की बाबाजींच्या मधुर आठवणीत होणाऱ्या या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी २ जानेवारी २०१८ रोजी सायंकाळी किंवा ३ जानेवारी २०१८ रोजी सकाळी खालील पत्त्यावर पोहोचून नामस्मरणाचा तसेच संत वचनांचा लाभ घ्यावा. परमपुज्य संत अजायब सिंह महाराजजींचा **भंडारा ७ जानेवारी २०१८** रोजी साजरा केला जाईल.

भूराभाई आरोग्य भवन,
शांतीलाल मोदी मार्ग, मयुर सिनेमाजवळ,
कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७
फोन नं.: ०९३२४६७०३०१, ०९८३३००४०००, ०२२-२४९६५०००

सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कार्यक्रम

१ ते ३ डिसेंबर २०१७
२ ते ६ फेब्रुवारी २०१८